- प्रेस नोट -

दि. २६/१०/२०२६

एम.आर.ए. मार्ग पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

फिर्यादी श्री.सचिन गोरख कोकरे, वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी (पोशिक्र १७००१६), रा.ठी. महाराष्ट्रनगर, मानखूर्द, तुर्भे मंडाळे, मुंबई यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. २५/१०/२०२६ रोजी ००.३० वा. ते ०१.०० वा.च्या दरम्यान कल्पना जंक्शन, पी.डीमेलो रोड, मुंबई येथे फिर्यादी नाकाबंदी कर्तव्य करीत असताना दोन अनोळखी इसम कर्नाक बंदरकडून उलट दिशेने मोटर स्कुटरवर येताना दिसले म्हणून ते त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याकरीता त्यांची मोटर स्कुटर अडवली असता त्या मोटर स्कुटरवर मागे बसलेला अटक आरोपी पुरूष वय-३५ वर्षे यास फिर्यादी हे कायदेशीर कर्तव्य करीत असलेल्या कारवाईचा राग असल्याने त्याने त्याच्या जवळील छोटी तलवार बाहेर काढून फिर्यादीला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याने ती तलवार त्याच्यावर उगारली. तसेच त्यांना शिवीगाळ करीत हाताने मारहाण करून त्यांना दुखापत पोहचवत त्यांचा सरकारी गणवेष फाडून त्यांच्या कायदेशीर कर्तव्यात अडथळा निर्माण केला म्हणून फिर्यादी यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन दि. २५/१०/२०२६ रोजी गु.र.क्र.४९६/२६,कलम १०९(१),१३२,१२१(१),२२१, बीएनएस २०२३ सह ४, २५ शस्त्र अधिनियम १९५९ व १३५, ३७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
